**विशेष दिवाणी दावा क्र. ४७/२०१९**

**CNR No. MHSO060005622019**

रेश्मा इंगळे तानवडे

वि.

समीर इंगळे तानवडे वगैरे

## आदेश निशाणी क्र. ८८ वर

प्रतिवादी क्र. १ व २ यांना भूसंपादन प्रकरणात मिळालेली मावेजा रक्कम व भविष्यात मिळणारी वाढीव नुकसान भरपाई रक्कम दिवाणी प्रक्रिया संहिता ऑर्डर ३८ रुल ५ प्रमाणे जप्त करुन न्यायालयात जमा करण्यात यावी यासाठी हा अर्ज देण्यात आलेला आहे.

०२. वादी यांनी असे नमूद केले की, वादी व प्रतिवादी यांच्या एकत्र कुटुंबाची मिळकत संपादीत झालेली आहे. त्याबाबत मिळालेल्या मोबदला रकमेमध्ये वादी यांचा हक्क व हितसंबंध आहे. प्रतिवादी क्र. १ ते ३ हे सदर नुकसान भरपाईची रक्कम हस्तगत करुन खर्च करण्याच्या तयारीत आहेत. तसे झाल्यास वादी यांचे वर अन्याय होईल. त्यामुळे ती रक्कम न्यायालयात जमा करणेबाबत आदेश देण्यात यावा याकरीता हा अर्ज देण्यात आला आहे.

०३. त्यावर प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी तीव्र आक्षेप नोंदवला आहे. प्रस्तुत मिळणारी नुकसान भरपाई मोबदला रक्कम प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी खर्च करु नये यासाठी या अगोदर वादी व प्रतिवादी क्र. ६ ते ८ यांनी तुर्तातुर्त मनाई हुकूमासाठी अर्ज निशाणी क्र. ५ आणि ४५ प्रमाणे दिला होता. तो नामंजूर करण्यात आला आहे. केवळ प्रतिवादी यांना त्रास देण्यासाठी हा खोटा अर्ज दिलेला आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्ज नामंजूर करण्यात यावा असे प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी लेखी म्हणणे देऊन नमूद केले.

०४. प्रतिवादी क्र. ५ यांनी सदर अर्जास म्हणणे देऊन वादी यांना त्यांचे समर्थन दिले आहे. प्रतिवादी क्र. ५ सुभाबाई गाडे यांनी असे नमूद केले की, त्यांचा देखील सदर

संपादीत जमीन व त्याबाबत मिळालेल्या मोबदला रकमेमध्ये हक्क व हितसंबंध आहे. दरम्यान प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी सदर रक्कम खर्च केली तर वादी व प्रतिवादी क्र. ५ यांचे नुकसान होईल. त्यामुळे अर्ज मंजूर करण्यात यावा असे त्यांनी नमूद केले.

०५. दिवाणी प्रक्रिया संहिता ऑर्डर ३८ रुल ५ प्रमाणे वादी यांच्या हक्कामध्ये होणा–या हुकूमनामाची अंमलबजावणी होऊ नये व त्यास अडथळा निर्माण व्हावा याबाबत कृती जर प्रतिवादी करत असतील तर विवाद्य मिळकत/प्रतिवादी यांची मालमत्ता जप्त करुन त्याबाबत सुरक्षा अनामत रक्कम मागण्याचा अधिकार न्यायालयास आहे.

०६. या प्रकरणामध्ये अगोदरच वादी व प्रतिवादी क्र. ६ ते ८ यांचा निशाणी क्र. ५ व ४५ प्रमाणेचा मनाई अर्ज नामंजूर करण्यात आलेला आहे. त्यामध्ये वादी व प्रतिवादी क्र. ६ ते ८ यांना प्रथमदर्शनी केस नाही, न्यायाचा समतोल त्यांचे बाजुने नाही. तसेच तुर्तातुर्त मनाई हुकूम न दिल्यास कोणतेही नुकसान होणार नाही असे निष्कर्ष मी नोंदवले आहेत. प्रथमदर्शनी संपादीत जमिनीचा मोबदला मिळवण्यास प्रतिवादी क्र. १ ते ३ हे पात्र आहेत. त्याबाबतची कारणमिमांसा मी निशाणी क्र. ५ व ४५ प्रमाणेच्या अर्जावर आदेश देतेवेळी सविस्तरपणे केलेली आहे.

०७. संपादीत जमिनीचा मोबदला रकमेमध्ये वादी तसेच प्रतिवादी क्र. ५ यांचा हक्क व हितसंबंध दिसून येत नाही. तसेच हा दावा वाटपासाठी दाखल करण्यात आलेला आहे. इतरही मिळकती प्रकरणामध्ये समाविष्ट आहेत. त्यामुळे नुकसान भरपाई रक्कम जप्त करुन न्यायालयात जमा करणेबाबत कोणतेही आदेश देणे योग्य होणार नाही. सबब मी पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आ दे श</u>**

अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

SHRIKRISHNA HARIBHAU INAMDAR
Digitally signed by SHRIKRISHNA HARIBHAU INAMDAR
Date: 2021.12.03 18:00:39 +0530

दि. ०३/१२/२०२१ ( श्रीकृष्ण हरीभाऊ इनामदार )

सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, पंढरपूर

**CERTIFICATE**

I, affirm that the contents of this PDF file Order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of stenographer | : | A. S. Bavikar |
| Name of the Court | : | Jt. C.J.S.D., Pandharpur |
| Order signed by the P. O. on | : | 03/12/2021 |
| Order uploaded on | : | 03/12/2021 |